महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.:- मआ/अतिक्रमण/ ४०५२
दिनांक :-. ०२/ ०२/ २०२६.

**-: कार्यालयीन आदेश :-**

मा. महापालिका आयुक्त यांचे दालनामध्ये दि.२०/०१/२०२६रोजी झालेल्या खाते प्रमुखांच्या बैठकीमध्ये कार्यालयीन कामकाजाचे सोयीच्या दृष्टीने इमारतीचे सामासिक अंतरामधील अनधिकृत बांधकामे, लगतच्या फूटपाथ व रस्त्यावरील पथारी, फेरीवाले यांचेवर बांधकाम विकास विभाग व अतिक्रमण विभाग यांचे मार्फत संयुक्त कारवाई करणेसाठी अतिक्रमण विभागाकडील संबंधित अधिकारी, कर्मचारी व बांधकाम विकास विभागाकडील उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी खालील प्रमाणे त्यांचे नावा समोरील दर्शविलेल्या परिमंडळ कार्यालयाकडील कामकाज करावयाचे आहे.

**कामकाज कार्यपद्धती**

१) नियुक्त कनिष्ठ अभियंता यांचेकडे नेमून दिलेल्या हद्दीमध्ये त्यांचे कामकाज सांभाळून जागा पाहणी करण्याचे काम करण्यात यावे.तसेच अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाकडील कर्मचारी यांनी सर्व्हे केलेल्या अहवालावर कारवाई करणे

२) कनिष्ठ अभियंता यांनी त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये चालू असलेल्या व झालेल्या सामाईक अंतरामधील बांधकामाची कागदपत्रे,फेरीवाला नोंदणी पत्र व इत्यादीची तपासणी करावी.

३) आवश्यक परवानगीन सेल अशी प्रकरणे संबंधित बांधकाम विकास विभाग व महापालिका सहाय्यक आयुक्तयांच्या लेखी निदर्शनास आणावे.

४) महापालिका सहाय्यक आयुक्त स्तरावर बीट निहाय नोंद वही मध्ये त्यांच्या बीट मधील अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम/इतर संबंधित घटनांची नोंद घ्यावी.

५) बीट नोंदवहीत नोंद केल्यानंतर संबंधित घटनेची शहानिशा संबंधित बांधकाम विकास विभाग व अतिक्रमण निर्मूलन विभाग अभियंता यांनी करावी.

६) बांधकाम विकास विभागाकडील संबंधित अभियंता यांनी खाजगी मिळकती मधील सामासिक अंतरामधील अतिक्रमण नियमानुसार नोटीस द्यावी व नोटीस कालावधीत आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास नियमानुसार कारवाई करणेसाठी अतिक्रमण निर्मूलन विभागाकडे कारवाईसाठी सर्व कागदपत्रांसह प्रकरण सादर करावे.

७) अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलनाबाबत निष्कासन कार्यवाहीचा दैनंदिन अहवाल उप आयुक्त (अतिक्रमण) यांचेकडे सादर करावा.

८) सहा. अतिक्रमण निरीक्षक / अतिक्रमण निरीक्षक यांनी अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम याबाबत सदर ठिकाणचे फोटो Before / After काढण्यात यावेत. सदर फोटो क्षेत्रिय कार्यालयाकडील नियुक्त अभियंत्यांचे संगणकावर अपलोड करावेत.

९) अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम याबाबत ठेवण्यात आलेल्या स्वतंत्र रजिस्टरचा दैनिक आढावा महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी घ्यावा. सदर बाबतची साप्ताहिक अहवाल अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) यांचेकडे उपआयुक्त (अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग) यांचे मार्फत सादर करावा. संबंधित बांधकाम निरीक्षक यांनी त्यांच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामांना दिलेल्या नोटिसांची माहिती, नकाशा इत्यादी

उपायुक्त अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मलन विभागाकडे देण्यात यावीत.

१०)संबंधित महा. सहा. आयुक्त कार्यालयाकडील अतिक्रमण निर्मूलन कारवाईसाठी उपलब्ध असणारे अतिक्रमण निरीक्षक, परवाना आकाश चिन्ह निरीक्षक बिगारी सेवकवर्ग, वायरमन व आरोग्य निरीक्षक इ. सेवक सदर कारवाईसाठी उपलब्ध करून देणे. वरील वेळापत्रकानुसार संयुक्त कारवाईचे वेळी संबंधित महा..महा. आयुक्त कार्यालयाकडे त्याझोन मधील अन्य महा. सहा. आयुक्त कार्यालय यांनी बिगारी सेवक व यंत्रणा (यूटिलिटीव्हॅन मदतीसाठी देण्यात यावी.)

११) कार्यकारी अभियंता व्हेईकल डेपो यांनी प्रत्येक उपआयुक्त, विभागीय कार्यालयाकडे कारवाईसाठी गरजेनुसार जेसीबी, ४ ट्रक व क्रेन तसेच इतर आवश्यक ती मशिनरी उपलब्ध करून देणे.

१२) रस्ता व पदपथावरील अतिक्रमणे हटविणे कामी कारवाईचे वेळेमध्ये काही आवश्यक बदल करावयाचा असल्यास त्याबाबतचा निर्णय उपआयुक्त अतिक्रमण /अनधिकृत बांधकाम निर्मलन विभाग यांनी घ्यावा.

१३) संयुक्त कारवाई मोहिमे करिता उपलब्ध झालेल्या सर्व यंत्रणेचा त्या दिवसाचे कारवाई नियंत्रण प्रमुख उप अभियंता अतिक्रमण /अनधिकृत बांधकाम निर्मलन विभाग व उप अभियंता बांधकाम नियंत्रण विभाग यांनी पूर्णवेळ व पूर्णक्षमतेनेवापर करून घ्यावा. कारवाई यंत्रणा थांबून राहणार नाही याबाबत आदले दिवशीच कारवाईचे योग्य ते नियोजन करावे.

१४) कारवाई झालेल्या ठिकाणी संबंधित महा. सहा. आयुक्त कार्यालयाकडून पुन्हा त्याठिकाणावर अतिक्रमणे होणार नाही याबाबत त्यांचेकडील यंत्रणेमार्फत कायमस्वरूपी दक्षता घ्यावी.

१५) उपरोक्त नियोजनानुसार ठरविण्यात आलेल्या कारवाई दिवशी सकाळी ७.००ते सायंकाळी ६.००वाजेपर्यंत बांधकाम निरीक्षक व सर्वसंबंधित अधिकारी यांनी पूर्णवेळ हजर राहणे आवश्यक आहे. अनुपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

१६) कारवाई केलेल्या ठिकाणच्या मालकांचे नाव, पत्ता क्षेत्रफळ इ. सह अहवाल त्वरित अतिक्रमण विभागाकडे पाठविण्यात यावा व त्यांचेमार्फत संबंधित कारवाई धारकांस कारवाई खर्चाची बिले त्वरित पाठविण्यात यावी

१७) उपआयुक्त, अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग यांनी कारवाईच्या नियोजन समन्वयाबाबत आढावा घ्यावा.

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत :- सर्व खातेप्रमुख
उप आयुक्त ( परिमंडळ क्र.१ ते ५) पुणे महानगरपालिका
सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त पुणे महानगरपालिका
सर्व संबधित अधिकारी कर्मचारी
यांजकडेस माहितीसाठी व आवश्यक तजबिजीसाठी रवाना............

दिनांक २९/०१/२०२६

| परिमंडळ क्र. | क्षेत्रिय कार्यालयाचे नाव | संबधित अतिक्रमण विभागाकडील अधिकारी /कर्मचारी | बांधकाम विकास विभाग झोन क्रमांक | उप अभियंता व त्यांचे नियंत्रणाखालील कनिष्ठ अभियंता बांधकाम विकास विभाग |
|---|---|---|---|---|
| परिमंडळ क्र.१ | १.नगररोड (बडगावशेरी) क्षेत्रिय कार्यालय<br>२.येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रिय कार्यालय<br>३.कै.बा.स.ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | अतिक्रमण /अनधिकृत बांधकामनिर्मुलन विभागाकडील अधिकारी/कर्मचारी | झोन क्रमांक-१ व ४ | श्री. इरफान शेख १४१६<br>श्री. प्रकाश महिंद्रकर११४७<br>श्री. विवेक डूब्बेवार१८४५<br>श्रीमती सपना सहारे ९६८९९६१५१५<br>श्री. योगेंद्र सोनवणे २२३८<br>श्री. संदीप शिंदे९८८१४३११००<br>श्रीमती संगीता लांघी १६८२<br>श्री. विजय कुमावत ९८५०६६४११६ |
| परिमंडळ क्र.२ | १.औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय<br>२.शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय<br>३.कोथरुड-बावधन क्षेत्रिय कार्यालय | अतिक्रमण /अनधिकृत बांधकामनिर्मुलन विभागाकडील अधिकारी/कर्मचारी | झोन क्रमांक-३ व ६ | श्री. रणजीत मुटकुले १२६८<br>श्री. किरण कलशेट्टी १४२७<br>श्री. माधव बोबडे१८०६<br>श्री. प्रवीण भावसार ११४४ |
| परिमंडळ क्र.३ | १.धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय<br>२.सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय<br>३.वारजे-कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय | अतिक्रमण /अनधिकृत बांधकामनिर्मुलन विभागाकडील अधिकारी/कर्मचारी | झोन क्रमांक-२ व ५ | श्री. राजेश खाडे १६०५<br>श्री. दीपक सोनवणे १७९८<br>श्रीमती गौरी गवते १६८३<br>श्री. वीरेंद्र टिळेकर ७६६६२५४९४७<br>श्रीमती रुपाली उगे १४६४<br>श्री. दत्तात्रय चव्हाण ८८५६०८३६९९<br>श्रीमती ज्योती बेदपाठक १२३८<br>श्री. माधव बोबडे१८०६ |
| परिमंडळ क्र.४ | १.हडपसर –मुंढवा क्षेत्रिय कार्यालय<br>२.वानवडी-रामटेकडी क्षेत्रिय कार्यालय<br>३.कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय | अतिक्रमण /अनधिकृत बांधकामनिर्मुलन विभागाकडील अधिकारी/कर्मचारी | झोन क्रमांक-१ व ५ | श्री. संदीप शिंदे९८८१४३११००<br>श्री. राहुल सोरटे१८९०<br>श्री. बीरेंद्र टिळेकर ७६६६२५४९४७<br>श्री. दीपक सोनवणे १७९८<br>श्रीमती रुपाली ढगे १४६४ |
| परिमंडळ क्र.५ | १.कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय<br>२.भवानी पेठ क्षेत्रिय | अतिक्रमण /अनधिकृत बांधकामनिर्मुलन | झोन क्रमांक- ४,५ व ६ | श्रीमती सुप्रिया वळसेपाटील १९०९<br>श्रीमती ज्योती वेदपाठक १२३८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कार्यालय<br>३.बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय | विभागाकडील अधिकारी/कर्मचारी | | श्री. अभय शिंदे १६१४<br>श्री. महिंद्र बहिरम१८२७<br>श्री. विजय कुमावत ९८५०६६४११६<br>श्रीमती संगीता लांघी १६८२<br>श्री. दत्तात्रय चव्हाण ८८५६०८३६९९<br>श्रीमती संगीता लांघी १६८२<br>श्री. विजय कुमावत ९८५०६६४११६ |

**अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाकडील सर्व्हे साठी नियुक्त कर्मचारी**

| अ.क्र. | कर्मचारी नाव | पद | करावयाचे कामकाज |
|---|---|---|---|
| १ | श्री साठे बापु राजाराम | वरिष्ठ लिपिक | १.संपुर्ण झोन क्रमांक १ ते ६ हद्दीमध्ये चालू असलेले व झालेले अनधिकृत बांधकाम शोधणे तसेच अधिकृत बांधकामाचे साईट मार्जिन,फ्रंट मार्जिन,बॅक मार्जिन शोधणे व त्याचा सविस्तर दैनदिन अहवाल संबधित झोनच्या उप अभियंता यांना सादर करणे .<br>२. लगतच्या फूटपाथ व रस्त्यावरील पथारी, फेरीवाले यांचा सर्व्हे करून त्याचा सविस्तर दैनदिन अहवाल संबधित विभागीय अतिक्रमण अधिकारी यांना सादर करणे .<br>३. संपुर्ण झोन क्रमांक १ ते ६ हद्दीमध्ये अनधिकृत बांधकाम व अधिकृत बांधकामावरील रुफटॉपचा सर्व्हे करून त्याचा अहवाल संबधित झोनच्या उप अभियंता यांना सादर करणे |
| २ | श्री हाशम पटेल | सहाय्यक अतिक्रमण निरिक्षक | |
| ३ | श्रीम समिना अब्दुलरहेमान शेख | लिपिक टंकलेखक | |

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका